अपर पोलीस महासंचालक /संचालक,दळणवळण व परिवहन,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
(पोलीस बिनतारी संदेश)
डॉ.होमी भाभा रोड, चव्हाणनगर, पुणे ४११००८
दूरध्वनी : ०२०-२५६५६९०८ (कार्यालय), ०२०-२५६५२५० (जनरल),
फॅक्स : ०२०-२५६५७९७४, ईमेल : dirpolwireless.pune@nic.in

क्र.आस्था-२/ई-४/निसू-२१-२२/चापोहवा-पदो/२०२२/4102 पुणे, दिनांक : 17/११/२०२२

विषय :- **निवडसूची २०२१-२०२२**
पोलीस बिनतारी संदेश विभागातील चालक पोलीस नाईक यांचे चालक पोलीस हवालदार पदी पदोन्नतीवर नियुक्तीबाबत.

संदर्भ :-
१) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि.२५/०५/२००४
२) महाराष्ट्र पोलीस(सुधारणा) सन २०१४, दि.२५/०६/२०१४ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) सन २०१५, दि.०६/०४/२०१५
३) शासन पत्र, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२/ए/१६-ब, दि.२९/१२/२०१७
४) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९
५) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक १८/०२/२०२१

--- ००० ---

**आदेश :-**

उपरोक्त संदर्भामध्ये नमूद शासन निर्णय व अधिसूचनांचे पालन करुन, पोलीस बिनतारी संदेश विभागातील खालील नमूद केलेल्या चालक पोलीस नाईक यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या घटकात त्यांची चालक पोलीस हवालदार या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कार्यभार ग्रहण केल्याच्या दिनांकापासून खालील अटींचे अधीन राहून पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे.

**चालक पोलीस नाईक : वेतन मॅट्रिक्स स्तर एस-८ रु.२५५००-८११००/- विशेष वेतन रु.७५०/-**
**चालक पोलीस हवालदार : वेतन मॅट्रिक्स स्तर एस-९ रु.२६४००-८३६००/- विशेष वेतन रु.७५०/-**

| अ. क्र. | चालक पोलीस नाईक यांचे नाव | सध्याच्या नेमणूकीचे कार्यालय | चालक पोलीस हवालदार पदोन्नतीवरील नेमणूकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | सुभाष बाळू गवळी | मो.प.वि., बिनतारी संदेश, संचालक आस्थापना, पुणे | पोलीस अधीक्षक, पुर्व विभाग, नागपूर |

**अटी व शर्ती**

०१) चा.पो.ना. ते चा.पो.हवा. पदावर देण्यात येणारी वरीलपदोन्नती ही मा.उच्च न्यायालयाचे मुंबई खंडपीठापुढील दाखल याचिका क्र.२७९७/२०१५ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या तसेच मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या तसेच शासन निर्णय दिनांक १८/०२/२०२१ च्या अधीनस्त राहून निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली आहे.

०२) उपरोक्त पदोन्नती झालेल्या अंमलदाराविरुद्ध गुन्हा दाखल झाला असेल/ निलंबनाची कार्यवाही केलेली असेल/ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असेल / ते एखादी शिक्षा भोगत असतील तर संबंधित घटकप्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांचेविरुद्धच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ फॅक्सद्वारे पाठवावी आणि पुढील आदेशाची वाट पाहावी.

०३) उपरोक्त पदोन्नत अंमलदार जर सध्या एखादी शिक्षा भोगत असतील अथवा यापुर्वी देण्यात आलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही तर अशा अंमलदाराकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगणेस तयार असल्याबाबत, दिनांकीत स्वाक्षरी केलेले लेखी हमीपत्र घेऊन, सदर हमीपत्राच्या अधीन राहूनच, पदोन्नतीवर सोडण्यात यावे तसेच संबंधित अंमलदारांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशातही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व संबंधितांच्या लेखी हमीपत्राची प्रत या कार्यालयास सादर करावी. जर त्यांनी लेखी संमती देण्याचे नाकारल्यास तसे या कार्यालयास तात्काळ कळविण्यात यावे.

०४) वरील पदोन्नती दिलेल्या अंमलदारास सदरची पदोन्नती स्वीकारण्याची इच्छा नसल्यास तसा त्यांचा लेखी अर्ज ०७ दिवसांत या कार्यालयास सादर करण्याची संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नोंद घ्यावी.